**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 4, July-Aug – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 01/08/2020 Accepted on : 19/08/2020 Publication Date: 31/08/2020

# भारताच्या विकासात स्त्रियांचे योगदान

**डॉ. भारत एम. राठोड**
सहयोगी प्राध्यापक, शिवप्रसाद सदानंद जायस्वाल, महाविद्यालय, अर्जुनी/मोरगाव, जि. गोंदिया
E-mail : 15bmrathod@gmail.com

**सारांश:** भारतीय महिला आधुनिकीकरणाच्या युगात आत्मविश्वासाने यशस्वीरित्या प्रत्येक शिखर काबीज करीत आहेत. सामाजिक, राजकीय, आर्थिक, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने मार्गक्रमन करीत आहेत. स्त्री शिक्षण, स्त्रियांमधील जागृती तसेच देशाच्या स्वातंत्र्य लढ्याच्या निमित्ताने घराबाहेर पडलेली भारतीय स्त्री आज सर्वच क्षेत्रांमध्ये सर्वोच्च स्थान मिळविण्याच्या प्रयत्नात आहे. 20 व्या शतकाच्या मध्यात स्त्रियांनी कुटुंब विकास, समाज विकास व राष्ट्र विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू केली. त्यातच वैद्यकीय, अभियांत्रिकी, संगणक, माहिती व तंत्रज्ञान, पत्रकारिता, लष्करी सेवा, कायदा व सुव्यवस्था, विमानसेवा, रेल्वे मोटार चालक, माऊंट एव्हरेस्ट सारख्या शिखरावर चढाई, उच्च शिक्षण, सांस्कृतिक क्षेत्र तसेच क्रिडा क्षेत्रातील जलतरण, वेट लिफ्टिंग, ॲथ्लेटिक्स नेमबाजी, बॉक्सिंग यासारख्या पुरूषी मकेदारी मानल्या गेलेल्या क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे आरक्षण, सवलत न मागता बुद्धीमत्तेच्या व कर्तृत्वाच्या जोरावर स्त्रिया सर्वच क्षेत्रात आपला ठसा उमटवू लागल्या आहेत.

या पाश्वभूमीवर 21 व्या शतकात स्त्रीचे भारतीय विकासातील नेमके स्थान काय असेल, याचा वेध घेतांना असे लक्षात आले की, 19 वे शतक हे स्त्रियांना कुटुंबात स्थान व प्रतिष्ठा मिळवून देण्यात खर्ची पडले. या शतकाच्या अखेरीस व 20 व्या शतकाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिबा फुले, महर्शी कर्वे, आगरकर आदी पुरूषांनी स्त्री सुधारणा व स्त्री उन्नतीसाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या कार्यातून स्त्रियांना आत्मबळ प्रकट करण्याची शक्ती प्राप्त होऊन कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यामुळे 20 व्या शतकात स्त्रीचं कुटुंबातील आणि पयार्याने सामाजिक स्थान उंचावल. यावरून 21 व्या शतकात तर स्त्रिया आधुनिक तंत्रज्ञानयुक्त भारत घडविण्यास समर्थ ठरू लागल्या. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात आपले कर्तृत्व पुरूषांबरोबर सिद्ध करू लागल्या.

## १ प्रस्तावना:

आज असीम कर्तृत्वाचे पंख लावून आकाशाला गवसणी घालणा-या स्त्रियांना भारतात हजारो वर्षापासून पुरूषप्रधान संस्कृतीच्या वर्चस्वातून स्त्रियांच्या सहभागावर आणि कार्यकर्तृत्वावर विविध स्वरूपाची बंधने घालण्यात आलेली आहेत. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने अथवा समानतेचे अधिकार हजारो वर्षापासून नाकारण्यात आले. भारतीय समाजव्यवस्थेतील प्रस्तुत स्थानाविषयी सर्वप्रथम 19 व्या शतकात महत्मा ज्योतिबा फुले यांनी आवाज उठविला. स्त्री-पुरूष समानतेसाठी स्त्रियांना पुरूषांप्रमाणेच शिक्षण मिळणे आवश्यक आहे. शिक्षणाअभावी चूल आणि मुल एवढ्याच विश्वात स्त्रियांना जगावे लागत असे. सावित्रीबाई फुले यांनी महात्मा फुलेंच्या कार्यात मोठा हातभार लावला. स्त्री शिक्षणाला चालना देण्यास स्त्री शिक्षिका म्हणून प्रतिकुल परिस्थितीत भूमिका पार पाडली. त्याचीच परिणती म्हणून आज स्त्री-पुरूष समानता साकार होत आहे. पुरूषप्रधान संस्कृतीचे चटके बसलेल्या ताराबाई शिंदे यांनीही त्याविषयी जागृती करण्याचा वसा घेतला. त्याच प्रयत्नांची फलश्रुती म्हणजे 20 व्या शतकात स्त्री जागृती निर्माण झाली. स्वतंत्र भारताच्या संविधानात स्त्री-पुरूष समानता निर्माण करण्यासाठी स्त्रियांना पुरूषांसारखेच अधिकार प्रदान केले.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडाचा विचार केला तर आपल्याला असे दिसून येते की, देशाला स्वातंत्र्याकडे नेण्यासाठी देवी राणी चैधरी देशाची प्रथम स्वातंत्र्यता सेनानी महिला यांनी स्वातंत्र्याचे बंड पुकारून स्वातंत्र्य चळवळीमध्ये आपला सहभाग दर्शविला आहे. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये क्रांतीकारक महिला म्हणून अगदी 8 व्या वर्गामध्ये शिकणा-या शांती घोष आणि सुनिता चैधरी यांचाही उल्लेख करावाच लागेल. त्यानंतर इंदुमती सिंह, लिला नाग, सुशिला मोहन, कल्पना दत्त, कल्याणी दास इत्यादी महिलांनी क्रांतीकारक महिला म्हणून काम केले आहे. 1942 च्या भारत छोडो आंदोलनामध्ये सरोजिनी नायडू, उशा मेहता, सूचेता कृपलानी, विजयालक्ष्मी पंडित, कस्तुरबा गांधी यांनी ब्रिटिशांविरूद्ध बंड पुकारून चले जावच्या चळवळीमध्ये महिला म्हणून सहभाग घेतला.

## २ स्त्रीवादी विचारधारा:

पुरूषप्रधान संस्कृतीचा विरोध करणे याच भूमिकेतून स्त्रीवादी चळवळी उदयास आल्याचे दिसून येते. पुरूष वर्चस्वाला आव्हान व स्त्रियांच्या शोषणाला विरोध करणारा एक विचारप्रवाह आहे. विविध प्रकारच्या लिंगभेदावर आधारित समस्या सोडविण्यासाठी व स्त्रियांचे हक्क मिळवून देण्यासाठी स्त्रीवाद हा शब्द पुढे आला असे म्हणता येईल. वास्तविक पाहता स्त्रीवाद ही स्त्रियांवरील अन्याय, अत्याचारासंबंधी विविध पैलू समजावून घेण्याचा प्रयत्न करणारी गतीशील विचारधारा आहे. स्त्रीवादी दृष्टीकोनातून स्त्री-पुरूष संबंधाच्या प्रस्थापित व्यवस्थेत

बदल घडवून आणण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा मिळवून देणे हा स्त्रीवादी विचारप्रवाहांचा मुख्य उद्देश आहे.

प्राचीनकाळापासून स्त्रिया हा अन्यायग्रस्त वर्ग आहे. या प्रमुख विचारांचा आधार घेवून स्त्रियांच्या मुक्ततेसाठी विचारधारा निर्माण झाल्या. स्त्रियांच्या अधिकारांना मानवाधिकारात स्थान दिल्यामळे हा लढा तिव्र झाला. समान कार्यासाठी समान वेतन, स्त्री-पुरूष समानता, आर्थिक समानता असे विचार परिवर्तनावाद्यांनी उवलून धरले होते. समाजवादी विचारधारेनुसार संपतीच्या वाट्यामध्ये मुलीपेक्षा मुलाला जास्त प्राधान्य दिल्या जाते. भांडवलशाही व्यवस्थेत स्त्रियांचे आर्थिक शोषण होते; त्यासाठी स्त्रियांना न्याय देणे आवश्यक आहे. स्त्रियांचे शोषण थांबविण्यासाठी स्त्रियांनी पारंपारिक मानसिकता व रूढीची बंधने झुगारून देणे आवश्यक आहे. पुरूषांच्या संघटनांना सोबत न घेता स्त्रियांनी स्वतःच्या वेगळया संघटना निर्माण करून स्वतंत्रपेण लढा दिला पाहिजे, हे स्त्रीवादाचे मुख्य सूत्र आहे.

या विचारप्रवाहामधून स्त्रीवादी चळवळी उभ्या झाल्या आहेत. या चळवळीद्वारेच अनंतकळापासून होणा-या स्त्री अत्याचाराला वाचा फुटली. स्त्रियांचा सन्मान वाढविणारे, कौटुंबिक व लैंगिक अत्याचार थांबविणारे कायदे निर्माण होऊ लागले. भारतात अनेक धर्मामध्ये स्त्रीयांकडे बघण्याच्या दृष्टीकोनात मोठया प्रमाणात बदल झालेला आहे. सुधारणावादाकडून परिवर्तनवादाकडे ही चळवळ गेलेली आहे. सामाजिक व राजकीय सत्तेची समान वाटणी, समान अधिकार, न्यायाचे समान वाटप, मतदानाचा अधिकार, आत्मसन्मान, प्रतिष्ठा असा हा प्रवास विविध विचारधारांच्या माध्यमातून होत आला आहे. समतावादी, उदारमतवादी विचारसरणी पासून वर्गसंघर्षवादी विचारसरणी पर्यंत नव्या-नव्या भूमिका घेत महिला मुक्ती व विकासाची चळवळ सक्रीय झाली आहे.

## ३ स्त्रीवादी चळवळीचा इतिहास:

19 व्या शतकात स्त्रियांचे हक्क मिळवून देण्यासाठी भारतात जो लढा सुरू झाला त्यास बंगालमध्ये राजाराम मोहन रा॔य, ईश्वरचंद्र विद्यासागर आणि महाराष्ट्रात महात्मा फुले, आगरकर, अण्णा कर्वे यांचे मोलाचे योगदान लाभले. पंडित रमाबाई सारखी अन्याय करणा-या धर्माचा स्वईच्छेने त्याग करणारी घटना ही स्त्रियांचे स्थान उंचावण्यास हातभार लावणारी ठरली. एकदा आपल्या अधिकारासाठी जागृत झालेली स्त्री स्त्रीमुक्तीचा लढा प्रखर करण्यासाठी पुढाकार घेण्यास तत्पर झाली त्यामुळेच स्त्रीजीवनाच्या कक्षा रूंदावत गेल्याचे दिसून येते.

1970 चे दशक हे तसे आंतरराष्ट्रीय स्थिंत्यतराचे दशक होते. याचकाळात भारतातही स्त्रीमुक्तीची चळवळ गतीमान झालेली आहे. याकाळात भारतात दुष्काळी स्थिती होती. महागाई, टंचाई निर्माण झाल्यामुळे अन्नधान्य मिळेणासे झाले. ग्रामीण व शहरी भागात त्याविरूद्ध आवाज उठविण्यास सुरूवात झाली. त्यात स्त्रियांचा सहभाग मोठयाप्रमाणात होता. याचकाळात 1974 मध्ये "भारतीय स्त्रियांचा दर्जा" याविषयावर अभ्यास करणा-या समितीने आपला अहवाल सादर केला. त्यात स्त्री जीवनाविषयी व स्थितीविषयी अनेक धक्कादायक बाबी पुढे आल्या. त्यातुनच स्त्री चळवळी विस्तारत गेल्या. स्त्री हक्कासाठी सामाजिक न्याय, आर्थिक हक्क, शैक्षणिक सवलती, राजकीय सहभाग वाढविणे, अत्याचार थांबविणे इत्यादी मूलभूत प्रश्न मांडल्या जाऊ लागले. न्यायव्यवस्थेनेही या कार्याला प्रोत्साहन दिले. अनेक खटले, बलात्काराची, लैंगिक शोषणाची, हुंडाबळीची प्रकरणे योग्यरित्या हाताळून स्त्रियांना हक्क मिळवून देण्यास सहाय्य केले आहे. अभ्यासक, विचारवंत, बुद्धीवादी विचारसरणीच्या पुरूष वर्गानेही या चळवळींना हातभार लावला आहे.

## ४ माहिती तंत्रज्ञानाचा स्वीकार:

मागील काही वर्षात संगणक, इलेक्ट्रानिक, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती होऊन ई-हेल्थ, ई-गव्हर्नन्स, ई-कॉमर्स इत्यादीच्या माध्यमातून स्त्रियांना घरात बसून उद्योगधंदा करण्याची संधी प्राप्त झाली आहे. साक्षरता, इंटरनेट सुविधा, उपयुक्तता आणि आर्थिक सक्षमीकरण याशिवाय नवीन तंत्रज्ञानाने कोणत्याही समाजामध्ये दीर्घ पातळीवरचे सत्तेचे वितरण, विकेंद्रीकरण शक्य झालेले आहे. प्रत्येक समाजाच्या सत्ता, आदर्श मूल्ये आणि वास्तव यांच्या तडजोडीसाठी असलेल्या मध्यवर्ती प्रक्रियांच्या मूळाशी महिती आणि तंत्रज्ञान आहे.

दक्षिण भारतात जेथे इंग्रजी साक्षरता जास्त आहे. त्याठिकाणी स्त्रियांच्या कौशल्याची आणि त्यांच्या विकास कार्याची प्रामुख्याने दखल घेतली गेली आहे. या क्षेत्रातील स्त्रियांच्या सक्रियतेने भारतातील खेड्यांमध्ये संगणकाने लोकांच्या जीवनात सुधारणा घडविण्यास प्रारंभ केला आहे. तेथील बहुतांश संगणक केंद्र स्त्रियाच चालवत आहेत. नेटवर्क आणि डाटाबेस तयार करण्याचे कार्य विशेषतः स्त्रियाच करतात. परिणामतः येथील स्त्रियांनी भारतीय विकासात मोलाची भर टाकून देशांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक विकासात भरीव योगदान दिले आहे.

नोक-यांमध्ये पुरूषांपेक्षा स्त्रियांना जास्त संधी मिळाली. 'डेटामेटिक्स' या भारतीय सॉफ्टवेअर कंपनीने घरून काम करण्यासाठी नेमलेल्या कामगारांमध्ये 90 टक्के स्त्रिया होत्या हे करतांना अशा स्त्रियांना कामावर ठेवले ज्यांच्यात त्यं॔ाना अपेक्षित असे कौशल्य होते. विशेषतः स्त्रियांना या क्षेत्रात प्राधान्य मिळाले असून चांगल्या पगाराच्या नोक-या स्त्रियांसाठी उपलब्ध होऊ लागल्या. मानवी भांडवलाचा -हास कशा पद्धतीने थांबविता येईल आणि भारतीय समाजाचा विकास कसा गाठता येईल. यादृष्टीने त्या प्रयत्नपूर्वक कार्यरत आहेत. इंटरनेट

सुविधांमुळे वित्तपुरवठा सल्ला आणि उद्योजकतेचे शिक्षण छोटया उद्योगांसाठी फायदेशीर ठरत आहे. उत्पादनांचे प्रदर्शन, किंमती पाहणे, संपर्क तयार करणे, करार करणे इत्यादी कामासोबतच प्रत्यक्ष उत्पादन विक्रीचे कार्यदेखील स्त्रियां दलालांच्या मदतीशिवाय करू लागल्या आहेत. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रात स्त्रियांचा प्रभाव वाढून भ्रष्टाचाराला काही प्रमाणात का होईना आळा बसला आहे. स्वयंविकासाबरोबरच समाजाच्या आर्थिक विकासाच्यादृष्टीने हे महत्वाचे पाऊल ठरलेले आहे.

## ५ व्यावसायिक क्षेत्रातील स्त्रियांचे योगदान:

भारताच्या विकासातील व्यावसायिक क्षेत्रात स्त्रियांची सक्रियता लक्षात घेतलास, व्यावसायिक प्रशिक्षणाद्वारे स्त्रियांनी आपल्या ज्ञान व कौशल्याचा उपयोग करून विविध क्षेत्रात अग्रस्थान पटकावलेले आहे. परिणामतः कुटुंबाची आर्थिक स्थिती नियंत्रणात आणून राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्यादृष्टीने सामूहिक जबाबदारीच्या तत्त्वनुसार आत्मनिर्भर होऊ लागल्या आहेत. योग्य मार्गदर्शनाद्वारे स्त्रिया आज कुशल व्यवसायी, अभियंता, डॉ.क्टर, अधिव्याखता, वकील, न्यायधीश, उच्चाधिकारी, वैज्ञानिक इत्यादी विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. आपले कौशल्य, श्रम, आत्मविश्वास, जिद्द पणाला लावून विज निर्मिती करण्याचे यशस्वी कार्य सिद्ध करून आंध्रप्रदेशतील सरकारसमोर तेथील स्त्रियांनी आर्थिक उत्पादनाचे एक नवीन साधन उपलब्ध करून दिलेले आहे. ज्यामुळे तेथील शासनाच्या आर्थिक विकासास मदत झाली आहे. आंध्रप्रदेशातील स्त्रियांनी बचतीच्या जोरावर स्वयांसिद्ध होण्यास निघालेल्या भारतीय स्त्रियांच्या अर्थकारणातील एक क्रांतिकारी वळण म्हणून विकासाच्या दृष्टीने येथील स्त्रियांच्या योगदानाची नोंद भारतातच नव्हे तर विदेशात देखील घेण्यात आली आहे. बचत गटाच्या बाबतीत दक्षिण भारत आघाडीवर आहेच, पण त्यातही आंध्रप्रदेशातील स्त्रियांनी विविध क्षेत्रात यश प्राप्त केले आहे. आज एकटया आंध्रप्रदेश राज्यात कोट्यावधी रूपयांची वार्षिक उलाढाल बचत गटांच्या माध्यमातून होऊ लागली. तेथील स्त्रियांच्या या विकास योगदानाचे अनुकरण आज अनेक राज्यातील बचत गटांच्या विस्तारित जाळयानुसार स्त्रिया करू लागल्या आहेत. स्त्रियांचा आत्मविश्वास बळावतो आहे. स्वावलंबी होऊन राज्याच्या विकासास हातभार लावण्यासाठी स्त्रिया पुढे सरसावत आहे, याचा प्रत्यय आपल्याला येत आहे.

राष्ट्रविकासाच्या दृष्टीने बचतीचे चांगले सामाजिक, आर्थिक, राजकीय परिणाम आता दिसू लागले आहे. स्त्रियांमध्ये परावलंबित्वाची भावना कमी होऊन वैचारिक आणि सैद्धांतिक निष्कर्षापर्यंत आपण पोहचू शकतो, त्या दिशेने वर्तन करू शकतो या आत्मविश्वासने त्या कार्य करू लागल्यामुळे सरकारनेही ब-याचशा विकासात्मक योजना राबविण्यास सुरूवात केली. सरकार आणि बँकानी जर सवलतीच्या व्याज दरात अधिकाधिक कर्ज दिले तर स्त्रिया स्वतःच स्वतःच्या शक्तीचे रूपांतर डोंगराएवढया विधायक कार्यात करू शकतील. स्त्रियांनी केवळ स्वतःच्या बळावर घडवून आणलेल्या या बदलाची दखल घेणे जरूरी आहे. जागतिक बँकेला, संयुक्त राष्ट्रसंघाला आणि अमेरिकेसारख्या राष्ट्रालाही या उगवत्या चळवळीचे महत्व पटले आहे. आंध्रप्रदेशात सहा लाखापेक्षा अधिक महिला बचत गट कार्यरत आहेत आणि आपला आवाज सर्वापर्यंत पोहचवण्यासाठी हे गट आता प्रकाशनाची साधनेही वापरत आहेत. तसेच आपल्या गटाने तयार केलेले उत्पादन व विज परदेशात पाठविण्याची त्यांची तयारी आहे. ती पूर्ण झाली तर देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाठी ती अतिशय महŸवपूर्ण घटना ठरेल; आणि भारतीय विकास कार्यात स्त्रियांच्या योगदानाची नोंद घेतल्या जाईल.

## ६ राजकीय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग:

भारतीय संविधानात लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार 1952 मधील प्रथम सार्वत्रिक निवडणूकीपासून स्त्रिया प्रत्यक्ष राजकीय प्रक्रियेत सहभागी होत आहेत. पंरतु राजकारणात पुरूषांपेक्षा स्त्रियांचा सहभाग कमी राहिला आहे. पण जेवढया काही स्त्रिया राजकारणात आहेत त्यांनी आपल्या कार्याची विशेष छाप पाडलेली आहे. प्रधानमंत्री पदापासून ते राष्ट्रपती पदापर्यंत, रणांगणापासून अवकाशापर्यंत स्त्रियांनी झेप घेतली आहे. स्थानिक व सांसदीय निवडणूकीतील स्त्रियांचा सहभाग कमी असला तरी आता त्यांचा सहभाग मात्र हळूहळू वाढत आहे. स्त्रियांचा संसदेतील सक्रीय सहभाग लक्षात घेतांना काही महिलांचा उल्लेख करणे सुसंगत ठरेल. उदा. इंदिरा गांधी, सोनिया गांधी सूचेता कृपलानी, विजयालक्ष्मी पंडित, नंदीनी सत्पयी, ताकेश्वरी सिन्हा, मृणाल गोरे, प्रमिला दंडवते, जयललिता, मोहसिना किडवई, राजेंद्रकुमारी बाजपेयी, नजमा हेपतुल्ला, उमा भारती, ममता बनर्जी, सुषमा स्वराज, विजयाराजे सिंधिया, मार्गरिट अल्वा, मायावती, पंकजा मुंडे सुप्रिया सुळे आदी स्त्रियांनी आपल्या व्यक्तिमŸवाची छाप संसदेवर व विधिमंडळावर टाकलीेली दिसते.

स्त्रिया आज कोणत्याही क्षेत्रात मागे राहिलेल्या नाहीत. दिसेंदिवस त्यांची उंच भरारी वाढतच चाललेली पाहावयास मिळते आहे. स्त्रिया राजकारणात सक्रियतेने सहभागी होऊन आपले कर्तृत्व सिद्ध करीत आहेत. त्याचे उदाहरण म्हणजेच भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती होण्याचा मान प्रतिभाताई पाटील यांना प्राप्त झाला. एवढया सर्वाेच्च शिखरावर स्त्रिया जाणे म्हणजेच भारतीयांकरिता ही गौरवाची व अभिमानची बाब आहे.

73 व्या संविधान विशोधनामुळे पंचायती व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियांना आरक्षण प्राप्त झाल्यामुळे त्यांच्यात हळूहळू राजकारणाबद्दल व राजकिय प्रक्रियेबद्दल आवड निर्माण होत आहे. त्यामुळे त्यांची जबाबदारी व त्यांचा राजकीय सहभाग वाढला आहे. ग्रामंपचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये शासनाची सुत्रे स्त्रिया हाती घेत आहेत, त्या निर्णय-प्रक्रियेत सहभागी होत आहे. स्त्रियांच्या वाढत्या सहभागामुळे राजकारणातील

स्त्री-पुरूष यांच्यातील सत्तेची समीकरणे बदलली व निर्णय प्रक्रियेतील त्यांचा आत्मविश्वास वाढला. चुल आणि मुल सांभाळणारी महिला पंचायतराज व्यवस्थेत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवित आहे.

## ७ निष्कर्ष:

भारतात प्राचीन काळापासून स्त्रियांचे स्थान दुय्यम आहे. पण अनेक विचारधारांच्या माध्यमातून स्त्री मुक्ती व विकासवादी चळवळी पुढे आल्या व स्त्रियांची दास्यत्वातून मुक्तता करण्याचा प्रयत्न केला. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीतून स्त्रियांनी आपले हक्क आपल्या प्रयत्नांनी मिळविले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतीय स्त्रियांना जागृत करण्याचे, साक्षर करण्याचे प्रयत्न झाले. अल्प प्रमाणात का होईना ज्या स्त्रिया भारतीय राजकारणात अग्रणी राहिल्यात, अधिकारी पदावर राहिल्यात, संशोधक बनल्यात त्यांनी आपली वेगळी छाप उमटविली आहे. ग्रामीण भागात स्त्रिया राजकीयदृष्ट्या जागृत होत असून त्यांचा राजकीय, सामाजिक व आर्थिक कार्यातील सहभाग वाढत आहे. प्रत्येकच क्षेत्रामध्ये देशाच्या या विकासाला चालना देण्याच्या उद्दशाने स्त्रियांनी आपले कर्तृत्व पणाला लावलेले दिसून येते. स्त्रियांच्या अस्तित्वाशिवाय देशाच्या विकासाची कल्पनाही आपण करू शकत नाही. कारण ज्या निसर्गाच्या शक्तींनी स्त्री-पुरूष यांची निर्मिती केली. त्यामध्ये स्त्रियांनाही सारखेच महŸव आणि स्थान दिले आहे, हे स्थान योग्य असल्याचे त्यांच्या कार्यकलापावरून, सृजनशिलतेवरून लक्षात येते. तसे पाहिले तर देशाच्या विकासाचे मुख्य सुत्र स्त्रियांच्या हातातंच आहे.

भारतीय ग्रामीण स्त्रियांचे व मुलांचे आरोग्य संवर्धन, शैक्षणिक, सामजिक व व्यावसायिक उत्थान करण्याच्यादृष्टीने स्त्री चळवळीचे योगदान महŸवाचे ठरले आहे. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी व त्या आर्थिकदृष्टया स्वावलंबी होण्यासाठी सरकारद्वारे ज्या योजना आणि उपक्रम राबविले गेलेत त्याचे फलित म्हणजेच देशाच्या सर्वांगीण विकासात आज सर्वत्र दिसून येणारी स्त्रियांची सक्रियता आणि उद्योगशिलता होय. भविष्यात भारताचा विकास साधण्यास पुरूषाप्रमाणेच स्त्रियांचाही वाटा समान राहिल, असे म्हटल्यास अतिशोक्ती ठरणार नाही.

## संदर्भग्रंथ:

1. डॉ. कारेकार, शोभा व डॉ. घोडके, शरद, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, नागपूर: अंशुल प्रकाशन, 2004
2. पाटील, राजाराम, लोकशाहीची नवी क्षितीजे, पुणे: सुविचार प्रकाशन मंडळ
3. डॉ. पवार, वैशाली, महिलांच्या संघर्षाचा आलेख, पुणे: डायमंड पब्लिकेशन, 2007
4. भागवत, विदयुत, स्त्री प्रश्नांची वाटचाल-परिवर्तनाच्या दिशेने, पुणे: प्रतिमा प्रकाशन, 2004.
5. नरूला, बी.सी., पंचायतराज व्यवस्था, नई दिल्ली: अर्जुन पब्लिशिंग हाऊस, 2005.
6. डॉ. राजकुमार, नारी के बदलते आयाम, न्यु दिल्ली: अर्जुन पब्लिशिंग हाऊस, 2007
7. घडियाली, रेहाना, भारतातील महिला विकासाची वाटचाल
8. डॉ. गव्हाणकर, रोहिणी, भारतीय स्त्री शक्तीचे राजकारणी रूप.
9. डॉ. राजकुमार, महिला एवं विकास, न्यु दिल्ली: अर्जुन पब्लिशिंग हाऊस, 2007
10. डॉ. सिंह, निशांत, समाज राजनीति और महिलाएं - दशा और दिशा.